# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, श.भ.सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१**

क्र.सहा.आ/ए/ ०६३५ / ईन /परिरक्षण, दिनांक: ३० / ०८ /२०२५

## स्थळ दरपत्रिका सुचना

गणेशोत्सव – २०२५ कालावधीत 'ए' विभागातील विविध प्रमुख चौकांमध्ये महाराष्ट्र शासनामार्फत गणेशोत्सव "राज्य महोत्सव" म्हणुन दर्जा देण्यात आल्याने त्याबाबत जनसामान्यांमध्ये जनजागृती करणे हेतू आकर्षक प्रकाशयोजना करून त्याचे सुशोभीकरण करणे, राज्य महोत्सवाचा अधिकृत लोगो ठळकपणे प्रदर्शित करणे, भारत सरकारचा ऑपरेशन सिंदूर, स्वदेशी, छत्रपती शिवाजी महाराज, यूनेस्को वारसा मानांकन प्रदान झालेले शिवकालीन १२ गड किल्ले व पर्यावरण यांना प्रसिद्धी देण्याचे मा. मंत्री, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतीक कार्य, महाराष्ट्र शासन तसेच मा.पालकमंत्री, मुंबई उपनगर, श्री.आशिष शेलार यांनी दि.२२.०८.२०२५ रोजीच्या बैठकीत निर्देश दिले असून मा.अति.आयुक्त (पू.उप.) यांनी पत्र क्र. अति.आ./पु.उप/९६०९ दि. २५.०८.२०२५ अन्वये विभाग कार्यालयास आदेशीत केलेले होते. त्या अनुषंगाने एकूण ११ कामांकरीता मोहोरबंद स्थळदरपत्रिका विशेष बाब म्हणून २४ तासांच्या कालावधीकरीता महानगरपालिका संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आली होती.

परंतु, सदर प्रस्तावित कामांव्यतिरिक्त खालील तक्त्यात नमूद ३ कामे तात्काळ करणे आवश्यक असल्याकारणाने समान कामांचा अनुभव असलेल्या कंत्राटदाराकडून विशेष बाब म्हणून २४ तासांच्या कालावधीकरीता मोहोरबंद स्थळदरपत्रिका पात्रता निकषानुसार मागविण्यात येत आहे.

| अनु. क्र. | कामाचे स्वरुप व ठिकाण | अंदाजित खर्च (रु.) (जीएसटी सह) |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शासनामार्फत गणेशोत्सव "राज्य महोत्सव" म्हणुन दर्जा देण्यात आल्याने त्याबाबत जनजागृती, 'ए' विभागातील कृत्रिम तलावांची माहिती (क्युआर कोड) व मार्गदर्शक सूचनांबाबतचे बॅनर 'ए' विभागातील प्रमुख चौकांमध्ये बॅनर (लाकडी फ्रेमसह) लावणेबाबत. | २,००,०००.०० |
| २ | महाराष्ट्र शासनामार्फत गणेशोत्सव "राज्य महोत्सव" म्हणुन दर्जा देण्यात आल्याने त्याबाबत जनजागृती उपक्रमाअंतर्गत 'ए' विभागात उभारण्यात आलेल्या कृत्रिम तलावांच्या ठिकाणी बॅनर (लोखंडी फ्रेमसह) व लोगो लावणेबाबत. | २,८५,०००.०० |

| | | |
|---|---|---|
| ३ | गणेशोत्सव दरम्यान उभारण्यात आलेल्या सर्व कृत्रिम तलावांबाबत माहिती, सुचना, दिशादर्शक फलक लावणे व रिगल येथे चारचाकी वाहनावर स्थित एल.ई.डी. स्क्रिन उपलब्ध करुन देणेबाबत. | २,९०,०००.०० |
| | **एकूण** | **७,७५,०००.००** |

पात्रता व निकष :

१. बृहन्मुंबई महानगरपालिका नोंदणीकृत कंत्राटदार असणे आवश्यक.

२. समान कामाचा अनुभव असणे आवश्यक.

सबंधित कंत्राटदाराने उपरोक्त पात्रता व निकषाच्या आधारे सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या ठिकाणी स्थळदरपत्रिका भरण्याचा कालावधी (दिनांक ०१.०९.२०२५ – सकाळी ११:०० ते दिनांक ०२.०९.२०२५ – दुपारी ०१:०० पर्यंत व त्याच दिवशी दिनांक ०२.०९.२०२५ रोजी दुपारी ०३:०० वाजता प्राप्त मोहोरबंद स्थळदरपत्रिका उघडण्यात येईल.)

**सही/-**

**सहाय्यक अभियंता (परि.) 'ए' विभाग**